# प्रकरण -4 वसाहतकालीन भारतीय समाज

प्र. २. ब्रिटिशकालीन सामाजिक स्थितीचे वर्णन करा ? किंवा

१८ व्या शतकाच्या मध्यातील सामाजिक परिस्थितींचे वर्णन करा.

उत्तर : प्रास्ताविक :

१८ व्या शतकातील भारतीय सामाजिक जीवनाचा अभ्यास करताना तत्कालीन ऐतिहासिक कागदपत्रे, परकीय प्रवास वर्णने, मिशनऱ्यांची प्रवासवर्णने, त्या काळातील साहित्याचा उपयोग होतो. त्या काळातील सामाजिक जीवन समजावून घेण्यासाठी आपणास प्रामुख्याने, सामाजिक वर्ग, वर्णव्यवस्था, अस्पृश्यता, गुलामगिरी, समाजातील स्त्रियांचे स्थान, पोषाख, दागिने, आहार, मनोरंजनाची साधने, यात्रा व उत्सव इत्यादी सामाजिक घटकांची माहिती करून घेणे आवश्यक आहे.

**समाजातील वर्ग :**

ब्रिटिशकालीन भारतीय समाजात तीन वर्ग अस्तित्वात होते. ते तीन वर्ग खालीलप्रमाणे सांगता येतील.

**१) वरिष्ठ वर्ग :**

पहिल्या वर्गात राजघराणे, मंत्री, मनसबदार व उच्च श्रेणींचे अधिकारी यांचा समावेश होता. या वर्गाला अनेक सोयी-सवलती प्राप्त झाल्या होत्या व तो ऐश्वर्यसंपन्न जीवन जगत होता. अमर्याद सत्ता असल्यामुळे अहंकारपणा होता. हा वर्ग कनिष्ठ वर्गाचे शोषण करीत असे. हा वर्ग चैनी विलासात तल्लीन होता; परंतु हा वर्ग दानशूर व कर्तव्यदक्ष होता. या वर्गातील लोक विद्वान व कलाकारांना आश्रय देत. गायन, वादन, नृत्य, शिकार ही त्यांच्या जीवनाची वैशिष्ट्ये होती.

**२) मध्यम वर्ग :**

दुसऱ्या वर्गात खालच्या श्रेणीतले मनसबदार, दुय्यम अधिकारी, विद्वान, कलाकार व व्यापारी यांचा समावेश होता. अधिक उच्च दर्जा मिळविण्यासाठी वरिष्ठांची मर्जी संपादन करणे हा त्यांचा स्वभावविशेष होता.

**३) कनिष्ठ वर्ग :**

तिसऱ्या वर्गात लहान व्यापारी व कलाकार, शेतकरी, मजूर यांचा समावेश होता. हा वर्ग प्रामाणिक व कष्टाळू होता; पण हा वर्ग गरीब होता. श्रमाचा मोबदला इतका अल्प होता की, कसा तरी उदरनिर्वाह होत असे. वेठबिगारीची पद्धत व दुष्काळ यामुळे हालाखीत भर पडत असे. त्यामुळे हा वर्ग देवभोळा व धर्मभोळा बनला होता.



Scanned with ACE Scanner

## २) वर्णव्यवस्था :

वैदिक काळात भारतात तीन वर्ण अस्तित्वात होते. ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य यावर आधारित समाजरचना होती. ही वर्णव्यवस्था रोटी-बेटी व्यवहाराच्या आड येत नसे. त्याकाळात जातीव्यवस्था तीव्र नव्हती; परंतु ब्राह्मण काळात समाजाची अवनती झाली. समाजाची अवनती झाल्यामुळे वर्णव्यवस्थेचे रूपांतर जातीव्यवस्थेत झाले. या काळात शुद्र हा नवीन वर्ण निर्माण झाला. हा वर्ग वरील तिन्ही वर्णांची कामे करीत असे. वर्ण हा कर्मानुसार न ठरता जन्मानुसार ठरू लागला. ब्राह्मणांच्या पोटी जन्म घेणारा कोणतेही काम करू लागला तरी शेवटी तो ब्राह्मणच राहत असे. जर शुद्र हा वेद विद्येत पारंगत असेल तरी तो शुद्रच राही.

## ३) जातीव्यवस्था :

जातीव्यवस्था हे हिंदू समाजाचे खास वैशिष्ट्य होते. विवाह आणि सहभोजन याबाबतीत जातीसंस्थेचे नियम काटेकोरपणे पाळले जात. जाती संस्थेमध्ये अनेक दोष होते; पण तरीही त्याचे काही गुणही होते. वेगवेगळ्या जाती व्यवसायानुसार कार्य करत असत. ते व्यवसाय वंशपरंपरेने ठरू लागले. त्यामुळे व्यवसायातील निपुणता व कौशल्य टिकून राहिले. पित्याच्या व्यावसायिक कौशल्याचा फायदा पुत्रालाही आपोआपच मिळे; पण १८ व्या शतकाच्या उत्तरार्धात राजकीय व आर्थिक क्षेत्रात झालेल्या उलाढालीमुळे लोकांनी जातीवर आधारलेले आपले परंपरागत व्यवसाय सोडून दिले व इतर व्यवसाय करण्यास सुरुवात केली. व्यवसायात बदल झाले तरीही विवाह, सहभोजनसारखे जातीव्यवस्थेचे इतर कायदे काटेकोरपणे पाळले जात. हे कायदे कोणी तोडल्यास जातपंचायतकडून न्यायनिवाडा केला जाई. जातपंचायत मृत्यू दंडासारख्या शिक्षा देत नसली तरी दंड, प्रायश्चित्त, बहिष्कार अशा शिक्षा दिल्या जात.

## ४) अस्पृश्यता :

जातीसंस्थेतूनच अस्पृश्यतेचा उदय झाला. समाजामध्ये स्पृश्य व अस्पृश्य या दोन वर्गात भेदभाव निर्माण झाले. समाजामध्ये ब्राह्मण वर्गाला महत्त्वाचे स्थान होते. त्यांना शिक्षणाचा, प्रशासनातील अधिकारांच्या जागा, न्यायदानात सवलती इत्यादी विशेषाधिकार होते. याउलट अस्पृश्य जातीवर अनेक बंधने होती. त्यांना गावाबाहेर राहावे लागे. शिक्षणाचा अधिकार नव्हता, समाजामध्ये सार्वजनिक ठिकाणी वावरणे त्यांना अशक्य होते. देवळामध्ये प्रवेश किंवा कोणतेही धार्मिक विधी करण्यास परवानगी नव्हती. त्यांना कोणतेच अधिकार नसल्यामुळे त्यांची अवस्था दयनीय होती.

## ५) समाजातील स्त्रियांचे स्थान :

सर्वसाधारणपणे स्त्रियांकडे पाहण्याचा दृष्टिकोन आदराचा असतो. हिंदू स्त्रिया निर्भयपणे सार्वजनिक ठिकाणी वावरत असत, असा उल्लेख परकीय लेखकांनी केला आहे. मुस्लिम कुटुंबामध्ये उच्चवर्गीयांमध्ये पडदा पद्धत पाळली जाई. हिंदूंमध्ये मात्र पडदा पाळला जात नसे. ज्या स्त्रिला उदरनिर्वाहासाठी नोकरी/व्यवसाय करणे भाग होते त्यांना पडदा पाळणे शक्य नव्हते. पडदा पद्धत मुख्यत: उत्तर भारतातच मोठ्या प्रमाणावर असलेली दिसते. त्यामानाने दक्षिण भारतात पडदा पद्धत फारशी असलेली दिसत नाही.

### अ) विवाह संस्था :

हिंदू समाजात पुरुषांच्या मानाने स्त्रियांचे स्थान नगण्य होते. त्यांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. आर्थिक स्वातंत्र्य नव्हते. त्यामुळे त्यांना पतीवर अवलंबून राहावे लागे. चूल आणि मूल एवढेच तिचे कार्यक्षेत्र मानले जात; परंतु कनिष्ठ जातीमध्ये स्त्रिया आर्थिक क्षेत्रात पतीला मदत करीत असत. त्यांना कुटुंबात महत्त्वाचे स्थान होते. १८ व्या शतकाच्या मध्यात त्या त्या जातीमध्येच विवाह होत असत. जातीबाहेर विवाह होत नसे. झाल्यास कठोर शिक्षा दिली जाई. कनिष्ठ जातीमध्ये एक पत्नीत्वाची प्रथा अस्तित्वात



Scanned with ACE Scanner

होती; परंतु समाजातील जमीनदार, सरदार, राजघराण्यातील लोक एकापेक्षा अधिक स्त्रियांशी विवाह करीत. विवाह संस्थेमध्ये अनेक अनिष्ट प्रथा रूढ होत्या. हुंड्याची प्रथा रूढ होती. वरिष्ठ जातीमध्ये घटस्फोटाला मान्यता नव्हती; परंतु कनिष्ठ जातीमध्ये घटस्फोटाला व पुनर्विवाहाला परवानगी होती. त्यामुळे वरिष्ठ जातीमध्ये कट, कारस्थान व अनैतिक संबंधांना ऊत आला.

**ब) बालविवाह :**

स्त्रियांना शिक्षण व इतर संस्कारापासून वंचित ठेवल्यामुळे एकमेव संस्कार म्हणजे विवाह होय. कुटुंबप्रमुख आपल्या जबाबदारीतून मुक्त होण्यासाठी मुलीचा विवाह चौथ्या/पाचव्या वर्षी लावून देत असे. विशेषत: जरट कुमारी विवाह होत असत. ८ वर्षांच्या मुलीशी ६० वर्षांचा वृद्ध विवाह करत असे, त्यालाच जरट कुमारी विवाह म्हणत. नाना फडणवीसाचे नवे लग्न ९ वर्षांच्या मुलीशी झाले, तर महादजी शिंदे यांचे ६० व्या वर्षी ८ वर्षांच्या मुलीशी झाले.

**क) सतीची चाल :**

भारतातील सर्वात दुष्ट चाल म्हणजे सती होय. सतीची चाल म्हणजे पतीच्या मृत्यूनंतर पत्नीने चितेवर स्वत:ला जाळून घेणे होय. पतीच्या मृत्यूनंतर जीवन जगणे अतिशय कठीण जात असल्यामुळे स्त्रिया सती जाणे पसंत करीत. तर काही वेळा नातेवाईक, इस्टेटीत वारसा नको म्हणून तिला सती जाण्यास भाग पाडीत असे. क्षत्रिय व ब्राह्मण वर्णातील स्त्रिया पतीच्या निधनानंतर सती जात असत. सती न जाता चितेपासून मागे फिरणाऱ्या स्त्रिला समाज वाळीत टाकीत असे. बंगालमध्ये काही विशिष्ट वर्गामध्ये सतीची पद्धत रूढ होती. विशेषत: कुलीन ब्राह्मणांमध्ये ही प्रथा मोठ्या प्रमाणात असलेली दिसते. १७९९ मध्ये एका कुलीन ब्राह्मणाच्या मृत्यूनंतर त्यांच्या २२ पत्नी सती गेल्या. एका अंदाजाप्रमाणे १८०४ मध्ये कलकत्ताच्या भोवती ४० मैल परिसरात किमान ३०० स्त्रिया सती गेल्या. राजस्थानमध्ये सतीचे प्रमाण मोठे होते. विशेषत: क्षत्रियांमध्येही मोठ्या प्रमाणात स्त्रिया सती जात. १९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात परिस्थिती बदलू लागली. इंग्रजी शिक्षणाच्या प्रसारामुळे लोकांमध्ये जागृती घडून आली. राजा राममोहन रॉयसारख्या समाजसुधारकांनी सतीच्या प्रथेला कडाडून विरोध केला. सरकारी अधिकारी व मिशनरी यांच्या मदतीने लॉर्ड बेंटिंग यांस १८२९ मध्ये सतीबंदीचा कायदा करण्यास भाग पाडले.

**गुलामगिरी :**

भारतीय समाजजीवनामध्ये गुलामगिरीची पद्धत अस्तित्वात होती. १८ व्या शतकाच्या मध्यकाळात गुलामगिरी दोन पद्धतीने दिसून येते. (१) शेतात काम करणारे गुलाम. (२) घरामध्ये काम करणारे गुलाम. शेतात काम करणारे गुलाम. शेतीच्या विक्रीबरोबर तेही विकले जात असत. गरिबीमुळे आई-वडील आपल्या मुला-मुलींना विकत असत. रजपूत, कायस्थ, क्षत्रिय हे आपल्या घरातील घरकामासाठी दास बाळगत. परकीय लोक भारतात आल्यानंतर या गुलामाच्या प्रथेला जास्त वाव मिळाला. मद्रास, सुरत आणि कलकत्ता येथील परकीय लोक अरेबियातून गुलाम खरेदी करत आणि आपल्या घरी घेऊन येत असत. गुलामाची खरेदी-विक्री मोठ्या प्रमाणावर होत होती. गुलामांची अदलाबदल केली जाई. गुलामाच्या वयानुसार गुलामाची किंमत केली जाई. गुलामांना दासही म्हटले जाई. महाराष्ट्रातील मराठ्यांच्या इतिहासाच्या कागदपत्रामध्ये गुलामगिरी पद्धतीची खूप माहिती उपलब्ध आहे. पुरुषाला 'पोरगा' तर स्त्रियाला 'बटीक' असे म्हणत.



Scanned with ACE Scanner

१८ व्या शतकाच्या अखेरीस व १९ व्या शतकाच्या सुरुवातीस लोक स्वत:ला गुलाम म्हणून का विकत असत याची अनेक उदाहरणे कागदपत्रामध्ये आहेत. गरीब व गरजू लोक पैशासाठी स्वत:ला वा स्वत:च्या मुलांना गुलाम म्हणून विकत असत. विशेषत: दुष्काळ वा पुरासारख्या नैसर्गिक आपत्तीच्या वेळी गरीब लोक स्वत:ला गुलाम म्हणून विकत असत. बिहारमधील लोक अडचणीच्या वेळी स्वत:ला विकत असल्याची उदाहरणे आहेत, असे इतिहासकार बचनन म्हणतात, तर माल्कमच्या मते माळव्यामध्ये व आसपासच्या प्रदेशात मुख्यत: 'सोदी' गुलाम असत. समाजातील श्रीमंत लोक नायकिणी नृत्य करणाऱ्या मुलींची खरेदी करत. राजपूत सरदार व प्रमुख ब्राह्मणांच्या घरीही गुलाम असत. बचननच्या मते उत्तरेतील राजपूत उघड उघड स्त्री गुलाम बाळगीत असत. त्यांच्या मुलांची एकवेळी जमात तयार होत असे. बिहारमधील श्रीमंत मुस्लिम पुरुष आहेत त्यांना 'नफर' असे म्हणत तर स्त्री गुलामांना 'लौंडी' असे म्हणत. त्याशिवाय मुलासदास नावाचे गुलामही त्यांच्याकडे असत.

भारतीय कुटुंबामध्ये गुलामांना चांगली वागणूक मिळे. हिंदू शास्त्रात गुलामांना माणुसकीची वागणूक द्यावी यावर कटाक्ष असलेला दिसतो. काही वेळा गुलामांना गुलामगिरीतून मुक्तता दिली जात. खरेदी-विक्रीमध्ये कुटुंबातील जवळच्या नातेवाईकांची ताटातूट होणार नाही याकडे ते लक्ष देत. काही गुलामांना खेडेगावातील छोटी अधिकार पदे दिली जात. शेतातील उत्पन्नाचा काही भाग त्यांना मिळत असे. त्यांच्या झोपड्यावर कर आकारला जात नसे. पाश्चात्त्य राष्ट्रामध्ये गुलामांना ज्या पद्धतीची अमानुष वागणूक दिली जात. त्या मानाने भारतात गुलामांना बरीच चांगली वागणूक दिली जात असे.

भारतातील युरोपियन वा युरोशियन आणि पोर्तुगीज कुटुंबात मात्र गुलामांना अत्यंत वाईट, अमानुष वागणूक दिली जाई. विशेषत: कलकत्त्यात त्यांची परिस्थिती अत्यंत वाईट होती. लहानशा चुकीसाठी त्यांना काही शिक्षा दिली जाई. फ्रेंच, इंग्रज, पोर्तुगीज हे युरोपियन गुलामांच्या व्यापारात गुंतले होते. १८ व्या शतकात कलकत्ता येथे गुलामांचा बाजार भरत असे. देशातल्या देशात तर गुलामांचा व्यापार होत असे पण त्याशिवाय आफ्रिका, इराण, अमेरिका या देशांमधून मुंबई व कलकत्त्यात गुलाम आयात केले जात, तर पोर्तुगीज व इतर युरोपियन व्यापारी भारतातून हिंदी महासागरातील सेंट हेलेना या फ्रेंच बेटावर व श्रीलंकेत गुलाम पाठवत असत. बंगालमध्ये फेरी विल्यमच्या गव्हर्नर जनरल कौन्सिलने सेंट हेलेना येथे गुलाम पाठविण्यास एका वटहुकूमाद्वारे बंदी घातली होती. १९ व्या शतकाच्या पूर्वार्धात मानवतावादी दृष्टिकोनातून १८४३ च्या भारत कायद्याने गुलामगिरी नष्ट करण्यात आली.

Scanned with ACE Scanner

तर : १. भारतात मध्यमवर्गाचा उदय :

१६ व्या शतकात ब्रिटिशांनी व्यापार करण्यासाठी 'ईस्ट इंडिया' कंपनीची स्थापना केली. ही कंपनी भारतात व्यापार करण्यासाठी आली. नंतर ती राज्यकर्ती बनली. कंपनीने भारतीय राजकारणात प्रवेश करण्यास सुरुवात केली, त्यावेळी भारतात अनेक लहान-लहान राज्ये अस्तित्वात होती. त्यांच्यात एकमत नसल्यामुळे कंपनीने त्यांच्या राज्यकारभारात हस्तक्षेप करण्यास सुरुवात केली. भारतात ब्रिटिशांची सत्ता स्थिर झाल्यानंतर त्यांनी एकछत्री सत्ता स्थापन केली. केंद्रीय सत्ता व प्रांतीय सत्ता बळकट आणि मजबूत केली. सामाजिक क्षेत्रात सुधारणा घडवून आणल्या, त्यामुळे समाजात नवीन मध्यम वर्गाचा उदय झाला. या नवीन वर्गाच्या उदयाला काही घटना कारणीभूत ठरल्या. ब्रिटिशांनी औद्योगिक क्रांतीनंतर आपल्या देशातील उत्पादित पक्का माल भारतात आणण्यास सुरुवात केली. भारतातून ते कच्चा माल घेऊन जात असे. त्यामुळे भारतातील कारागिरांनी स्वतःच्या हातांनी तयार केलेल्या वस्तूंचा खप होईनासा झाला. इंग्लंडच्या मालापुढे भारतीय मालाचा टिकाव न लागल्याने भारतातील लहान-लहान उद्योगधंदे बंद पडले. त्यामुळे कारागीर बेकार झाले. बेकार झालेले कारागीर कारखान्यात कामगार म्हणून काम करू लागले. अशा प्रकारे समाजात भांडवलदार व कामगारवर्गाचा उदय झाला. शेतीचे व्यापारीकरण झाल्यामुळे समाजात जमीनदाराचा वर्ग उदयास आला. त्यांनी आर्थिक क्षेत्रात भाग घेण्यास सुरुवात केली. कंपनीला प्रशासकीय यंत्रणेत भारतीय लोकांची मदत घेण्याची गरज भासू लागली. कारण इंग्लंडच्या लोकांना लठ्ठ पगार द्यावा लागत असे. ते कंपनीला अशक्य होऊ लागल्याने कंपनीने कनिष्ठ पदावर भारतीय लोकांची नेमणूक करण्यास सुरुवात केली. त्यासाठी भारतीय लोकांना सुशिक्षित करणे आवश्यक होते म्हणून त्यांनी भारतात अनेक ठिकाणी शाळा, महाविद्यालये सुरू केली. ब्रिटिशांच्या शिक्षण पद्धतीमुळे अनेक भारतीय लोक सुशिक्षित झाले. अशा प्रकारे समाजात बुद्धिजीवी वर्गाचा उदय झाला. भारतात जातीव्यवस्था असून जातीभेद मानले जात होते. पाश्चात्त्य शिक्षणामुळे जातीव्यवस्थेची तीव्रता कमी झाली. वर्णव्यवस्था मागे पडली. सुशिक्षिताचा



Scanned with ACE Scanner

नवा वर्ग निर्माण झाला. शिक्षण, मालमत्ता, व्यवसाय इत्यादी बाबतीत वेगळेपण असले तरी त्या सर्वांमध्ये काही गोष्टी समान होत्या. त्या समान भूमिकेतून उदय पावलेल्या नव्या वर्गाला 'मध्यम वर्ग' असे म्हणतात. भारतातील मध्यम वर्ग हा पाश्चात्त्य समाजातील मध्यम वर्गापेक्षा तत्त्वज्ञान, रचना इत्यादी बाबतीत वेगळा होता.

भारतातील सर्व राज्ये ब्रिटिशांच्या अमलाखाली आल्यानंतर राज्यकर्ता वर्ग नष्ट झाला. समाजात जमीनदारवर्गाचा उदय झाला. औद्योगिक क्रांतीमुळे नवनवीन उद्योगधंदे, कारखाने, गिरण्या सुरू झाल्या. नवीन शहरे उदयास आली. या शहरात कारखानदार म्हणून उद्योगपतीवर्गाचा उदय झाला, तसेच कामगारांचाही उदय झाला. ब्रिटिशांनी राज्यकारभार करण्यासाठी मुंबई, मद्रास, कोलकत्ता या शहरात न्यायालये, प्रशासकीय इमारती, शिक्षणसंस्था, पुरातन विभाग, व्यापारी कार्यालये सुरू केली. या कार्यालयात कामकाज पार पाडण्यासाठी कारकूनवर्गाची भरती करण्यात आली. पुरातत्त्व विभागात संशोधनाला चालना दिली. अशा प्रकारे ब्रिटिशांच्या धोरणामुळे समाजात कारकूनवर्ग, शिक्षकवर्ग, लेखक, विचारवंत, प्रशासकीय अधिकारी, कनिष्ठ न्यायाधीश इत्यादी सरकारी नोकर हे मध्यमवर्गाचे प्रमुख घटक होते. समाजातील श्रीमंतवर्ग, सत्ताधारीवर्ग आणि आर्थिकदृष्ट्या दुर्बल, शारीरिक कष्ट करणारा वर्ग या दोन्ही वर्गाच्या मधल्या वर्गाला 'मध्यमवर्ग' असे म्हणतात.

इ. स. १८१३ ते १८३३ या काळात भारतात मध्यमवर्गाचा उदय झाला. समाजातील बुद्धिवंत, विचारवंत, शासकीय वर्गीयांनी उच्च व गरीब यांच्यात समन्वय साधून राष्ट्रविकासासाठी आवश्यक असणाऱ्या वैचारिक पार्श्वभूमीचा आराखडा तयार केला होता. त्यांनी सामाजिक व धार्मिक सुधारणा करण्यासाठी अनेक संघटना स्थापन केल्या. राजा राममोहन रॉय, स्वामी दयानंद सरस्वती, स्वामी विवेकानंद, केशवचंद्र सेन, महात्मा फुले इत्यादी समाजसुधारकांनी भारतीय समाजातील दोष दूर करण्यासाठी प्रयत्न केले. त्यांच्या प्रयत्नांमुळेच भारतीय समाज एकसंध व डोळस बनण्यास मदत झाली. धार्मिक व सामाजिक सुधारणांचा पाठपुरावा करण्यासाठी राजा राममोहन रॉय यांनी २० ऑगस्ट १८२८ रोजी 'ब्राह्म समाजा' ची स्थापना केली. भारतीय समाज हा अज्ञान अंधश्रद्धेमध्ये अडकलेला होता. व्यक्तीच्या जीवनात धर्म, रूढी, परंपरा, जात याला फार महत्त्व होते. अशावेळी रॉय यांनी सर्व धर्मग्रंथांचा अभ्यास करून असे स्पष्ट केले की, 'कोणत्याही धर्माचा द्वेष करू नका, मानव एकच आहे. कोणत्याही धर्मापेक्षा मानवता हा धर्म सर्वश्रेष्ठ आहे.' महात्मा फुल्यांनी पददलित समाजासाठी केलेली सर्वांत महत्त्वपूर्ण कामगिरी म्हणजे इ. स. १८७३ मध्ये 'सत्यशोधक समाजा' ची स्थापना होय. धार्मिक आणि सामाजिक गुलामगिरी नष्ट करणे हे या समाजाचे उद्दिष्ट होते.

भारतात इंग्रजी सत्तेची स्थापना झाल्यावर भारतीय लोक पाश्चात्त्य राष्ट्राच्या संपर्कात आले. त्यामुळे पाश्चात्त्य जगातील नवनवे व आधुनिक विचार भारतीयांना माहीत होऊ लागले. रुसो, माँटेस्क्यू, बेंथम जॉन स्टुअर्ट मिल, हर्बर्ट स्पेन्सर इत्यादी पाश्चात्त्य विचारवंतांच्या स्वातंत्र्यवादी व उदारमतवादी विचारांनी भारतीय तरुण भारावून गेले. वरील पाश्चात्त्य विचारांपासून प्रेरणा घेऊन आपल्या देशातही या प्रकाराचे विचार परिवर्तन घडवून आणावे, अशी भावना भारतीय मध्यम सुशिक्षित लोकांच्या मनात मूळ धरू लागली

Scanned with ACE Scanner

### ३. ख्रिश्चन मिशनऱ्यांचे कार्य :

ख्रिश्चन धर्मात आपल्या धर्मतत्त्वांचा व आचारप्रणालीचा जगभर प्रसार करणारी आणि त्याद्वारे ख्रिश्चन धर्म अनुयायांची संख्या वाढविणारी एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत आहे. अप्रगत मागासलेल्या समाजात धर्मप्रसार करणाऱ्या संस्थांना मिशन आणि धर्मप्रसाराचे कार्य करणाऱ्या व्यक्तींना मिशनरी म्हणतात. अनंत अडचणीवर मोठ्या चिवटपणे त्याच्यावर मात करून तो मोठ्या चिकाटीने धर्मप्रार करीत. इ. स. १६ व्या शतकापासून धर्मप्रसाराच्या हेतूने ख्रिश्चन मिशनऱ्यांचे भारतात आगमन होऊन आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या लोकांना मदत करून, रंजल्या-गांजलेल्यांना मदतीचा आधार देऊन त्यांच्याशी सेवाभावी वृत्तीने



Scanned with ACE Scanner

वागून प्रथम लोकांची मने जिंकाची आणि ख्रिश्चन धर्माविषयी आकर्षण निर्माण करावयाचे अशी त्यांची सामान्यपणे पद्धत होती म्हणूनच त्यांनी प्रथम सामाजिक व शैक्षणिक क्षेत्रात कार्य सुरू केले. त्याद्वारे आपल्या धर्माविषयी आकर्षण निर्माण केले. पाश्चात्त्य व्यापाऱ्यांच्या बरोबर मिशनरीही आले. पाश्चात्त्य व्यापाऱ्यांपैकी प्रथम पोर्तुगीजांनी आपली राजकीय सत्ता गोव्यात स्थापन करून तेथे मिशनऱ्यांनी धर्मप्रसाराचे कार्य सुरू केले.

**मिशनऱ्यांना दूर ठेवण्याचे इंग्रजाचे धोरण :**

इतर पाश्चात्त्यांप्रमाणे इंग्रजदेखील व्यापारासाठी भारतात येऊन येथील राजकीय परिस्थितीचा फायदा घेऊन आपली राजकीय सत्ता स्थापन केली. तरीही त्यांनी आपले लक्ष व्यापारापासून विचलित होऊ दिले नाही. हिंदुस्थानातील धार्मिक वा सामाजिक क्षेत्रातील कारवायांकडे लक्ष दिले नाही. त्यात हस्तक्षेप करण्यापासून त्यांनी स्वत:ला हेतुपुरस्सरपणे दूर ठेवले. आपल्या व्यापारी हितसंबंधाना कोणत्याही कारणाने धक्का पोहोचणार नाही, याची त्यांनी खबरदारी घेतली. ब्रिटिशांच्या पूर्वी भारतात पोर्तुगीज येऊन भारतीयांच्या शिक्षणाबाबत त्यांनी रस दाखवून जेसुईटांनी गोव्यात चौल येथे पहिले कॉलेज सन १५७५ मध्ये काढले; परंतु त्यांच्या जबरदस्तीने ख्रिश्चन बनविण्याच्या धोरणामुळे पोर्तुगीज अप्रिय झाले, त्यामुळे आपल्या नियंत्रणाखालील प्रदेशात ख्रिश्चन धर्मप्रसाराचे कार्य करण्यास मज्जाव केला. भारतातील जनता परंपरावादी असून, त्यांच्या मनावर धर्माचा विशेष प्रभाव होता. इंग्रज आपल्या धर्मात हस्तक्षेप करीत आहेत, असे त्यांना जाणवल्यास येथील समाजात असंतोष निर्माण होऊन ब्रिटिश सत्तेला धोकादायक ठरेल, त्यामुळेच कंपनीने मिशनऱ्यांच्या कार्याला विरोध केला. सन १८०७ साली टेलर नावाच्या ख्रिश्चन मिशनऱ्याला मुंबईत राहण्याची परवानगी दिली नाही. एखादा मिशनरी चिकाटीने धर्मप्रसाराचे कार्य करीत असेल, तर त्याला हद्दपार केले जाई. विल्यम कॅरे या मिशनऱ्याला आपले कार्यालय व मुद्रणालय कोलकत्याहून श्रीरामपूर डॅनिश वसाहतीत हलविणे भाग पडले. सैन्यातील एखादा शिपाई स्वत:हून ख्रिश्चन झाल्यास त्याला बडतर्फ करीत. सन १८१३ पर्यंत ख्रिश्चन मिशनऱ्यांविषयी ब्रिटिश सरकारने हेच धोरण स्वीकारले होते.

**ब्रिटिशांच्या मिशनरीविषयक धोरणात बदल :**

सन १७९३ साली कंपनीच्या सनदी कायद्याच्या नूतनीकरणाच्या वेळी मिशनरी व शिक्षक यांना भारतात जाण्याची परवानगी देण्याचा ठराव मांडल्यानंतर धार्मिक तटस्थेच्या नावाखाली परवानगी नाकारली. १९ व्या शतकाच्या पहिल्या दशकात गव्हर्नर लॉर्ड मिंटो यास असे आढळून आले की, मिशनऱ्यांना भारतात येणे बंद केल्यामुळे व खासगी शिक्षणसंस्था जास्त लक्ष देत नसल्यामुळे भारतीयांच्या शैक्षणिक प्रश्नापासून इंग्रजांना फार काळ लांब राहता येणार नाही म्हणून राजकीयदृष्ट्या भारतातील आपले स्थान सुरक्षित आहे हे जाणून त्यांनी १८१३ च्या सनदी कायद्याने ख्रिश्चन मिशनऱ्यांना भारतात जाण्याची परवानगी दिली. त्यानंतर झुंडीच्या झुंडी मिशनरी भारतात येऊन त्यांनी सुशिक्षित व अशिक्षित वर्गाच्या बाबतीत धर्मप्रसारासाठी वेगवेगळे तंत्र अवलंबिले. सुशिक्षित व अशिक्षित वर्गाला ख्रिश्चन धर्मातील उच्च आदर्श तत्त्वे, समानता, नीतितत्त्वे यांची महती पटवून दिली. हिंदू धर्मातील अनिष्ट रूढी, प्रथा, परंपरा, धर्मातील कर्मकांडाचे स्तोम, अनिष्ट सामाजिक प्रथा दाखवून दिल्यामुळे सुशिक्षित तरुण वर्गाला ख्रिश्चन धर्मातील एकेश्वरवाद, आदर्श नीतितत्त्वे, प्रायश्चित्ताची कल्पना व सामाजिक जीवनातील समानता यांचे आकर्षण वाटले. अनेक हिंदू तरुणांनी हिंदू धर्माचा त्याग करून ख्रिश्चन धर्माला कवटाळले. अशिक्षित, अज्ञानी, अप्रगत समाजात धर्मप्रसारासाठी त्यांनी वेगळे तंत्र वापरले. त्यांना धर्मांतराला प्रवृत्त करण्यासाठी ग्रामीण, दुष्काळी, डोंगराळ



Scanned with ACE Scanner

भागात दौरे काढून तेथे जनतेसाठी ठिकठिकाणी मदत केंद्रे उघडली. गोरगरिबांच्या, अस्पृश्य वर्गातल्या, शिक्षणापासून वंचित असलेल्या मुलांसाठी शाळा काढल्या. दवाखाने काढून मोफत औषध पाण्याची सोय केली. गरजूंना आर्थिक साहाय्य केले. गांजलेल्याचे अश्रू पुसले. सामाजिक/धार्मिक उत्सावाप्रसंगी आपल्या चांगल्या धर्मतत्त्वाचा प्रसार केला. समतेच्या पायावर उभ्या असलेल्या या धर्माकडे कनिष्ठ वर्ग आकृष्ट झाला.

**मिशनऱ्यांचे शैक्षणिक कार्य :**

शैक्षणिक क्षेत्र धर्मप्रसाराला एक उत्तम जागा आहे हे ओळखून त्यांनी अनेक ठिकाणी शाळा स्थापन केल्या. १८१८ मध्ये कोलकत्त्याजवळ श्रीरामपूर येथे पहिले मिशनरी कॉलेज काढले. शिक्षणप्रसाराने धर्मप्रसाराला मदत होईल अशी धारणा असल्याने मिशनऱ्यांनी जाणूनबुजून धर्मप्रसार शिक्षणापासून अलग केला नाही. कोलकत्त्यातील ८ हजार मुस्लिमांनी धर्मांतराच्या हेतूने सरकार जाणूनबुजनू हिंदू व मुस्लिम अभ्यासक्रम डावलीत आहे, असा आरोप असलेले एक निवेदन गव्हर्नर जनरलला पाठविले, तेव्हा बेंटिंकने धार्मिक तटस्थता पाळण्याचे सर्व शाळांना आदेश दिला. मुस्लिमांत याची तीव्र प्रतिक्रिया उमटली; परंतु सरकारने तटस्थतेचे धोरण स्वीकारले. तटस्थता म्हणजे एक प्रकारची संमतीच असे. तत्पूर्वी १८१३ पासूनच मिशनऱ्यांनी भारतभर वेगवेगळ्या प्रांतात जाऊन शैक्षणिक कार्यावर आपले लक्ष केंद्रित केले. गॉर्डन हॉल याच्या नेतृत्वाखाली १८१३ साली मिशनऱ्यांची पहिली तुकडी महाराष्ट्रात आली. १८१३ ते १८ या काळात त्यांनी मुंबईत अनेक ठिकाणी शाळा सुरू केल्या. १८२४ साली मुंबईत मुलींसाठी स्वतंत्र शाळा उघडली. दिवसेंदिवस शाळांची संख्या वाढत गेली. मुलींसाठी वसतिगृहांची सोय करून श्रीमंत स्त्रियांच्या घरी जाऊन त्यांना शिकविण्याची व्यवस्था केली. डॉ. विल्सन यांनी मुंबईमध्ये मुस्लिमांसाठी स्वतंत्र शाळा सुरू केली. पाश्चात्त्य सुधारणावाद्यांनी आपल्या शैक्षणिक तत्त्वज्ञानविषयक आणि धार्मिक कल्पनांद्वारे लोकांचे क्षितिज विस्तृत केले.

विल्यम बेंटिंकच्या काळात इंग्रजी भाषा ही शिक्षणाचे माध्यम बनले. त्याचा फायदाही ख्रिश्चन मिशनऱ्यांना झाला. इंग्रजी भाषेचा फायदा घेऊन त्यांनी ख्रिश्चन धर्मतत्त्वांचे इंजेक्शन भारतीयांच्या मनात टोचले. शैक्षणिक संस्था ख्रिश्चन धर्माचे तत्त्वज्ञान शिकविण्याची खात्रीची व सुरक्षित मैदाने बनली. शाळा पूर्णतः धर्मगुरूंच्या नियंत्रणाखाली आणून बायबल व ख्रिश्चन धर्माचे तत्त्वज्ञान अभ्यासक्रमात समाविष्ट केले. भारतीय समाजातील अज्ञान हे तर मिशनऱ्यांना वरदानच ठरले. स्त्री शिक्षणामागे मिशनऱ्यांचा काहीही हेतू असला तरी मुलींच्या शिक्षणासाठी सर्वप्रथम शाळा मिशऱ्यांनीच चिनसारा येथे सुरू केली. त्यापाठोपाठ बंगाल, मुंबई प्रांतात शाळा सुरू होऊन १८३४ पर्यंत बंगालमध्ये मिशनऱ्यांनी चालविलेल्या ५० पेक्षा अधिक शाळा होत्या. समाजप्रबोधनासाठी आवश्यक असलेल्या घटकांचे भारतीयांना ज्ञान झाले. त्याच्यामुळेच समाजसुधारणा व धर्मसुधारणेच्या चळवळीला अप्रत्यक्षपणे चालना मिळाली.

Scanned with ACE Scanner